ॐ

# अध्याय तेरावा

१ वदे श्री-पति, ‘‘क्षेत्रज्ञ बोलती पार्था, ह्या देहातें
ह्यातें जाणे तया बोलती ‘क्षेत्रज्ञ’ असें ज्ञातें १

२ सर्व क्षेत्रीं मी चि किरीटी, क्षेत्र-ज्ञ वसें जाण
क्षेत्र-क्षेत्रज्ञासि जाणणें तें चि मानितों ज्ञान २

३ क्षेत्र कोणतें ? कसें ? कोणते तद्विकार ? कोठून ?
क्षेत्र-ज्ञ कसा ? कोण ? ऐक तें संक्षेपें सांगेन. ३

४ हें चि ऋषि-जनें परोपरीनें नाना-विध छंदांत
असे गाइलें आणि विवरिलें श्रुतींत उपनिषदांत ४
कार्य-कारणीं निर्णय करुनी बहुविध दृष्टांतांनीं
सप्रमाण हें कथिलें ब्रह्म-प्रतिपादक वाक्यांनीं ५

५ पांची भूतें, अहंकार तो, बुद्धि, मूळ अव्यक्त,
मन, दशेंद्रियें, पांच आणखीं पांच विषय ते येथ ६

६ द्वेष आणि सुख दुःख चेतना इच्छा धृति संघात
संक्षेपें हें क्षेत्र वर्णिलें असे विकारें युक्त. ७

पृथ्वी पाणी तेज समीरण गगन पांच हीं 'भूतें'
प्रकृति-तत्त्व जें मूळ बोलती 'अव्यक्त' असें त्यातें ८

पाप-पुण्य सुख-दुःख निवडणें हें निर्मळ हें मैळ
ब्रह्म-जीव-संबंध सांगणें हा 'बुद्धी' चा खेळ ९

जसा किरीटी असे चि काष्ठीं अग्नि सर्वथा गुप्त
'अहंकार' तो तसा राहतो प्रकृतिमाजिं साद्यन्त १०

पांची भूतें पावती जिथे ऐक्य अशा देहांत
मी मी म्हणतो जो नाचवितो चहूंकडे निभ्रांत ! ११

वायां 'मन' हें नांव तत्त्वतां कल्पना चि सावयव
जेणें संगें जीव-दशा ये सद्वस्तूसि सदैव १२

नेत्र श्रोत्र घ्राण रस त्वक् 'ज्ञानेंद्रिय-पंचक' हें
हस्त पाद मुख शिस्न गुद अशीं 'पांच' आणखीं पाहें १३

स्पर्श रूप रस गंध पांचवा जाण शब्द गगनाचा
'पंच-विध असा विषय' सर्वथा असे ज्ञान-करणांचा १४

देणें-घेणें आणि चालणें शब्द बोलणें वाचे
मल-मूत्राचा त्याग 'पांच हे विषय' कर्म-करणांचे १५

इंद्रिय-वृत्ती विलीन होती हृदयाच्या एकान्तीं
जिवा-शिवाची पडतां गांठी होय तें चि 'सुख' म्हणती १६

न पावतां ही अशी अवस्था भ्रांत होउनी जगणें
विषयीं रमणें केविलवाणें ‘दुःख’ तें चि तूं जाणें १७
आणि इच्छिलें आमिष न मिळे इंद्रियांसि सेवाया
असा पडे जो डाव पांडवा, ‘द्वेष’ असें नांव तया १८
चैतन्याची सत्ता साची असंग साक्षीभूत
जाण शरीरीं सर्वतोपरी ती चि ‘चेतना’ येथ १९
भूतकाळची गोष्ट आठवे अथवा कानीं येई
तदा अंतरीं स्वभावतां जी जागृत वृत्ती होई २०
आणि पांडवा, वाटे व्हावा तो तो विषय प्राप्त
ती चि सर्वथा असे बोलिली ‘इच्छा’ जाण यथार्थ २१
ह्या देहीं सहकार्य ठेविते जी पांची भूतांचें
त्या शक्तीतें जाण भारता, नांव ‘धृति’ असें साचें २२
छत्तीसांचा समुदाय तया ‘संघात’ असें नांव
क्षेत्र असें हें तुज सांगितलें विशद करुनियां सर्व २३
७ तरी सर्वथा ऐक तूं अतां ज्ञान-लक्षणें पार्था,
जीं स्वभावतां अंगिं बाणतां लाभे मुक्तावस्था. २४
नमस्कारुनी केला कोणी कधीं मान-सन्मान
तरी मरण तें गमे तयातें ‘अमानित्व’ हें जाण २५
मुखें न बोले जरि बहु केले उपकार जगावरतीं
झांकी निपजे दान-पुण्य जें ‘अदंभित्व’ तें निरुतीं २६

हळुवारपणें पाय ठेवणें चालतां चि भूवरतीं
स्पर्शे जीवां तेथ पांडवां, तयांसि सुख-विश्रांति २७
स्नेह पाझरे पुढां अक्षरें धांवती तयामागें
बोल न च कुणा खुपे अर्जुना, अथवा वर्मीं लागे २८
परिमित बोले शब्द कोंवळे सत्य आणि सु-रसाळ
हित-प्रद भले सहज उसळले जसे अमृत-कल्लोळ २९
कृपादृष्टिनें घडे पाहणें जया भूत-मात्रास
बुडत्या जीवा हात द्यावया कधीं न मानी त्रास ३०
काया-वाचा-मनें सर्वथा विश्व-हितास्तव झटणें
पर-पीडा न च कधीं चिंतणें ती चि 'अहिंसा' जाणें ३१
तरी स्वभावें जें जें पावे जगीं प्रियाप्रिय तें तें
निवांत सोशी सर्वथा अशी 'क्षांति' बोलिली येथें ३२
निःस्पृह बोले निर्भय डोळे अंतःकरणीं सरळ
'आर्जव' नांवें हें जाणावें ज्ञान-लक्षण प्रबळ ३३
नित्य अंतरीं सर्वतोपरी श्रीसद्‌गुरुचें ध्यान
निधान पार्था, तें चि सर्वथा तें चि सुख-समाधान ३४
गुरु देवता गुरु चि देवता सर्वथैव गुरु माता
नेणे पार्था, मार्ग अन्यथा जो गुरुसेवेपरता ३५
न जाय तीर्था न च धरी व्रता नेम-धर्म न च पाहे
क्षण हि न राहे गुरुसेवेविण 'आचार्योपासन' हें ३६

अंतरीं भला निर्मळ झाला आत्म-ज्ञानें श्रेष्ठ
बाह्य-भाग तो कर्मे चि धुतो जाण 'शौच' तें येथ ३७
न ढळे चित्तीं जरी उसळती सुख-दुःखांच्या लाटा
स्थिर स्वरूपीं वृत्ति जाहली तें 'स्थैर्य' नर-श्रेष्ठा ३८
मन जतन करी नित्य अंतरीं सावध राहे पूर्ण
काढुनि घेतो विषयांतुनि तो 'आत्म-विनिग्रह' जाण ३९
८ मानी वमनासमान नाना विषय सर्व ते येथें
स्वर्ग-सुख हि तें तुच्छ जयातें 'वैराग्य' असें निरुतें ४०
हें मी केलें सिद्धि पावलें मजमुळें चि हें साच
अशी अहंता न शिवे चित्ता 'अनहंकार' असाच ४१
'जन्म-मृत्युचें वार्धक्याचें नाना व्याधि-गणांचें
भान राखणें सदा अंतरीं तसें दुःख-दोषांचें' ४२
९ 'गृह-सुत-दारादिकीं न थारा मोह-ममत्वा देणें'
'इष्टानिष्टीं सदा किरीटी, समत्व चित्तीं असणें' ४३
१० 'अनन्यतेनें मातें भजणें मी चि होउनी निरुतें'
'करणें विजनीं वस्ती विटुनी बहु-जन-संमर्दातें' ४४
११ 'अध्यात्मीं दृढ-बुद्धि ठेवणें आत्मानात्म-विवेकें'
'तत्त्व-ज्ञानें ज्ञेय देखणें सर्वत्र सदा असकें' ४५
अशी रहाटी दिसे किरीटी, ज्याच्या देहाधारें
मूर्तिमंत तें ज्ञान अवतरे जाण मनुष्याकारें ! ४६

डोलत जैसा दिसे आंवळा तळ-हातीं वाटोळा
पार्था, पाहें तैसें तुज हें ज्ञान दाविलें डोळां ४७

ह्या ज्ञानाशीं विपरित अशीं सर्वथैव जीं दिसती
तीं तीं जाणें सर्व लक्षणें अज्ञानाचीं निरुतीं ४८

१२ ज्ञेय काय तें कथितों तूतें ऐक अर्जुना, आतां
जया जाणतां पुरुष तत्त्वतां भोगी मुक्तावस्था ४९

अनादि परतें असे जयातें पर-ब्रह्म हें नांव
राहे सहजें सर्वथैव जें गिळुनी सदसद्भाव ! ५०

नसे म्हणावें तरी स्वभावें दिसतें विश्वाकार
विश्व म्हणावें तरी सर्वथा ही माया साचार ५१

मृत्तिका घटीं कीं तंतु पटीं अभिन्न एक चि पाहें
तैसें निरुतें सर्वात्मक तें सर्व होउनी राहे ५२

१३ जिथे पाहावें तिथे तयातें मुखें मस्तकें डोळे
हात पाय हि तसेच चि, राही जग व्यापुनी सगळें ५३

एक चि असतां नुरे तत्त्वतां व्याप्य-व्यापका ठाव
द्वैत बोलुनी परी दाविती अद्वैताचा भाव ५४

१४ जरी सर्वतोपरी भासतो इंद्रिय-गुण-आभास
तरी इंद्रियातीत भारता, सहजें जाण तयास ५५

अलिप्त परि तें धारण करितें पहा सकल विश्वास
निर्गुण मानीं भोग त्रि-गुणीं जरी घडे हि तयास ५६

१५ तें प्राण्यांच्या आंत राहतें तसें असे बाहेरी
चराचरीं तें भरुनि राहिलें तें जवळी तें दूरी ५७

अतिसूक्ष्मत्वें असे स्वभावें न च तें इंद्रियगम्य
तर्क न च शिवे तिथे जाण तें मन-बुद्धीसि अगम्य ५८

१६ अविभक्त असे परंतु भासे विभक्तसें तें भूतीं
तें भूतादिक चराचराचें असे चि कारण निरुतीं ५९

पार्था, पाळी सृजी संहरी तें चि भूत-मात्रास
महा-शून्य तें त्रि-गुणांसह जें राहे गिळुनि नभास ६०

१७ तें अग्नीचें दीपन साचें तें जीवन चंद्राचें
बोलती तमापलीकडे तें महा-तेज तेजाचें ६१

तें आदीचा आदि सर्वथा तें वृद्धीची वृद्धी
तें जीवाचा जीव पांडवा, तें बुद्धीची बुद्धी ६२

तें कानाचें कान मनाचें मन हि तें चि तूं जाण
तें चि गतीचे चरण अर्जुना, तें प्राणाचा प्राण ६३

तें नयनाचे नयन हि तेणें आकारे आकार
विस्तारे विस्तार हि तेणें संहारे संहार ६४

तें भूमीची भूमी जळ तें राहे पिउनि जळास
होय निशि-दिनीं दिवे-लावणी ज्या तेजें तेजास ६५

श्वासोच्छ्वास हि तें पवनाचा गगनाचा अवकाश
ज्ञेय तें असे जेणें भासे आघवा चि आभास ६६

विश्वात्मक तें विश्व-रूप तें व्यापुनियां विश्वास
असे एकलें गिळुनि राहिलें जें द्वैताद्वैतास ! ६७

जया देखतां आटे द्रष्टा-दृश्य-दर्शन त्रिपुटी
जेथें ज्ञाता-ज्ञान तत्त्वतां ज्ञेय-रूप तीं होती ६८

ज्ञान हि निरुतें तसें ज्ञेय तें ज्ञान-गम्यही तेंच
असे चि हृदयीं सर्वां ठायीं जगीं दुजें नाहीं च ! ६९

१८ असें क्षेत्र हें असें ज्ञान हें असें ज्ञेय हें पाहें
करुनी सोपें तुज संक्षेपें सांगितलें पार्था, हें ७०

हें चि जाणती म्हणुनी होती पात्र जगीं मद्भक्त
सहजें येथें सायुज्यातें करुनि घ्यावया प्राप्त ७१

१९ प्रकृति पुरुष हीं तत्त्वें दोन्ही अनादि ऐसें मानीं
'प्रकृति-तत्त्व' तें क्षेत्र सर्वथा 'पुरुष' क्षेत्र-ज्ञ गणीं ७२

केवल सत्ता तो चि तत्त्वतां 'पुरुष' बोलिला येथ
कर्मजात तें पार्था, निरुतें 'प्रकृति-तत्त्व' निभ्रांत ७३

महदादिक हे विकार पाहें प्रकृतिपासुनी होती
तसे सर्वथा त्रि-गुण हि पार्था, सत्त्वादिक संभवती ७४

२० कार्य-कारणा जाण अर्जुना, प्रकृति बोलती मूळ
सुख-दुःखांचे भोग भोगणें हा पुरुषाचा खेळ ७५

२१ प्रकृति-वश असा पुरुष भोगितो प्रकृति-जन्य गुण-भोग
शुभाशुभ तया जन्म घ्यावया लावितो चि गुण-संग ७६

असे तत्त्वतां त्याची सत्ता तो अज अव्यय पाहें
परंतु माया-संग धरुनिया जन्म-मृत्युतें लाहे ७७

२२ सर्वद्रष्टा भर्ता भोक्ता महेश्वर अनुज्ञाता
असे शरीरीं सर्वतोपरी पार्था, त्याची सत्ता ७८

परम पुरुष तो तेविं बोलती परमात्मा हि तयातें
पुरुष-प्रकृति-विवंचना ती तुज सांगितली येथें ७९

२३ तो पुरुष असा आणि गुणमयी अशी प्रकृति जो जाणे
सर्वथा तया न च धनंजया, पुनरपि जन्मा येणें ८०

असो शरीरी तो संसारीं करो हि कर्मे सारीं
परी अंतरीं सर्वतोपरी अहं-ममत्वा न धरी ८१

म्हणुनी देहीं विदेहत्व तें तया लाधलें जाण
स्वानुभव-बळें सहज खुंटलें जन्म आणखीं मरण ८२

२४ कुणी अंतरीं ध्यान धरुनियां आपआपणां बघती
सांख्य-योग तो कुणी अन्य ते कर्म-योग आचरती ८३

२५ स्वयें नेणती कुणी किरीटी, अशा विविध मार्गांस
परी ऐकती संत-जनोक्ती ठेवुनियां विश्वास ८४

आणि वर्तती तसें चि भजती तत्पर होउनि मातें
ते हि तत्त्वतां तरती पार्था, सर्वथैव मृत्यूतें ८५

असे सकल हे योगी पाहें आत्म-रूप अनुभविती
विविध साधना करुनि अर्जुना, मुक्त सर्वथा होती ८६

जें जें कांहीं स्थावर अथवा जंगम निपजे येथें
जाण क्षेत्र-क्षेत्रज्ञाच्या संयोगें सर्व हि तें ८७

२७ तरी अर्जुना, एक चि नाना नाशिवंत भूतांत
सम अविनाशी ईश्वर पाहे तो ज्ञाता निभ्रांत ८८

२८ असोत नाना दीप अर्जुना, जैसें एक चि तेज
सर्वां भूतीं समान तैसें आत्म-तत्त्व तें सहज ८९

स्वानुभवें सर्वत्र आघवें ईश-तत्त्व जो पाहे
आत्म-नाश तो न करी सहजें परम गतीतें लाहे ९०

२९ प्रकृती चि करी कर्मे सारीं आत्मा आश्रय मात्र
तो न च कर्ता वा न करविता जरि भरला सर्वत्र ९१

परमात्म्याचें असें चि साचें जया जाहलें ज्ञान
जाणें पार्था, तो चि सर्वथा जगीं ज्ञान-संपन्न ९२

३० एक चि सोनें होउनि लेणें नटलें विविधाकारीं
नाना रूपीं नटे तेविं तें आत्म-तत्त्व अविकारी ९३

सर्वां भूतीं अशी प्रचीती एकत्वाची येतां
पावे ज्ञाता तो चि तत्त्वतां ब्रह्म-रूपता पार्था. ९४

३१ अनादि निर्गुण अव्यय म्हणुनी हा परमात्मा येथ
राहे देहीं तरी न कांहीं करी न होई लिप्त ९५

तो अमूर्त ना मूर्त अर्जुना, तेविं एक ना विविध
तो आत्मत्वें असे स्वभावें नसे मुक्त ना बद्ध ! ९६

जळांत भासे रवि-बिंब जसें तयांत रवि तों नाहीं
भरतसत्तमा, तो परमात्मा तसा चि पाहें देहीं ! ९७

क्षण-भंगुर हें शरीर पाहें आत्मा शाश्वत नित्य
तेविं सर्वथा शरीर मिथ्या आत्मा निर्गुण सत्य ९८

३२ सूक्ष्म म्हणुनि तें लिप्त न होतें जसें सर्वगत गगन
भरला देहीं सर्वत्र तसा अलिप्त आत्मा जाण ९९

३३ जसा प्रकटवी एकला रवी पार्था, सकल हि लोक
क्षेत्राभास-प्रकाशक तसा क्षेत्रज्ञ असे देख १००

३४ लटिकी सृष्टी लटिकी प्रकृती लटिकीं नाना भूतें
विश्वीं भरलें सत्य एकलें आत्म-तत्त्व शाश्वत तें १०१

क्षेत्र आणखीं क्षेत्रज्ञाचा असा भेद ओळखिती
ज्ञान-दृष्टिनें प्रकृति लंघुनी ते ब्रह्मत्वा येती.'' १०२

क्षेत्र-क्षेत्रज्ञ-भेदाचें असे ज्यांत निवेदन ।
तो चि भावार्थ गीतेचा हा अध्याय त्रयोदश ॥ १३ ॥